मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.in » पुणे, पिंपरी-चिंचवड » बुधवार, दिनांक ३० ऑगस्ट २०२३। पान १

# पिंपळे गुरवमधील रखडलेल्या कामांबाबत अजित पवारांना निवेदन

## पिंपळे गुरवमधील विकासकामे जैसे थे अवस्थेत

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी ।** पिंपळे गुरवमधील रखडलेले सिमेंट रस्ते, ड्रेनेज लाईन, चिल्ड्रन प्लेग्राउंड आदी प्रलंबित विकासकामे तातडीने मार्गी लावावीत, यासाठी सामाजिक कार्यकर्ते तानाजी जवळकर यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे.

उपमुख्यमंत्री पवार नुकतेच पिंपरी-चिंचवड शहराच्या दौऱ्यावर आले होते, त्यावेळी तानाजी जवळकर यांनी अजित पवार यांची भेट घेऊन त्यांना निवेदन दिले. यावेळी शहराध्यक्ष अजित गव्हाणे, माजी विरोधी पक्षनेते विठ्ठल उर्फ नाना काटे, माजी शहराध्यक्ष संजोग वाघेरे, माजी नगरसेवक राजेंद्र जगताप, सामाजिक कार्यकर्ते शाम जगताप, मराठवाडा जनविकास संघाचे अध्यक्ष अरुण पवार, माजी नगरसेवक शिवाजी पाडुळे, राजू लोखंडे, विष्णू शेळके, सुरेश देवराज आदी उपस्थित होते.



या निवेदनात म्हटले आहे, की पावसाळ्यापूर्वी पूर्ण होणे अपेक्षित असलेली पिंपळे गुरव परिसरातील विकासकामे जैसे थे अवस्थेत आहेत. महापालिका अधिकारी, स्मार्ट सिटी अधिकारी, ठेकेदार यांच्याकडे वारंवार मागणी, तक्रार करूनही कामे मार्गी लागत नाहीत. त्यामुळे नागरिकांना समस्यांचा सामना करावा लागत आहे. जवळकर नगर ते कल्पतरू फेज एक दरम्यान चाळीस फुटी सिमेंट रस्ता, कृष्ण मंदिर गल्ली क्रमांक १ व २ येथील ड्रेनेज लाईन व रस्त्याचे सिमेंट काँक्रीटीकरण, सिंहगड कॉलनी व ऋतुराज कॉलनी जवळकरनगर मधील ड्रेनेज लाईन व रस्त्याचे सिमेंट काँक्रीटीकरण आदी रखडलेल्या कामांमुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. तर कै. बट्टूराव जगताप उद्यानात सुविधांचा अभाव असल्याने त्याचा लहान मुले व ज्येष्ठ नागरिकांना वापर करता येत नाही. त्यामुळे इथे सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात, अशी मागणीही करण्यात आली आहे.

# छत्रपती शिवरायांच्या रूपातील गणेशमूर्तीवर प्रतिबंध घाला!

## संभाजी ब्रिगेडचे पोलिस आयुक्तांना निवेदन

**पिंपरी। न्यूज एक्सप्रेस मराठी।** छत्रपती शिवरायांच्या रूपातील गणेश मुर्ती स्थापना आणि विक्रीस प्रतिबंध घाला, अशी मागणी संभाजी ब्रिगेडचे पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष सतिश काळे यांनी केली. असे प्रकार करून छत्रपती शिवरायांचा अवमान करू नये. अन्यथा राज्यभर तीव्र आंदोलनाचा इशारा संभाजी ब्रिगेडचे पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष सतीश काळे यांनी दिला. पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त विनाय कुमार चौबे यांना दिलेल्या निवेदनात हा इशारा दिला. जिल्हा कार्याध्यक्ष ज्ञानेश्वर लाभे, सचिव गणेश कुंजीर, शहर संघटक निरंजन सोखी आदीसह पदाधिकारी यांच्या निवेदनावर सह्या आहेत.



निवेदनात नमूद केले आहे की, छत्रपती शिवाजी महाराज यांना अखंड भारतातील नागरिक आराध्य दैवत मानतात. शिवरायांनी आपल्या स्वकतृत्वाने स्वराज्य घडविले आहे. सर्व जाती धर्माच्या लोकांना संघटित करून स्वराज्य रक्षण केले. शेतकऱ्यांना पूरक योग्य प्रकारचे धोरणे आखली. स्त्रियांचा सन्मान केला. चुकीच्या गोष्टींचे समर्थन केले नाही. त्यामुळे बहुजनांमध्ये छत्रपती शिवरायांविषयी आदराची भावना आहे. मात्र काही समाज विघातक लोक त्यांचा सातत्याने अवमान करत आहेत. हे महाराष्ट्रात कदापिही सहन केले जाणार नाही. सध्या सगळीकडे गणेशोत्सवची मंडळाकडून तयारी सुरू असल्याचे दिसते. काही मुर्तीकार छत्रपती शिवाजी महाराजांच्या रूपातील गणेशमुर्ती तयार करत आहेत. त्याच मुर्ती काही दिवसांनी विक्रीसाठी येणार आहेत. शिवरायांच्या रूपातील याच गणेश मुर्तीची १० दिवस स्थापना करण्यात येणार असून १० दिवसा नंतर याच प्रतिकात्मक स्वरूपातील मुर्ती नदीमध्ये विसर्जित केल्या जातात. आपण छत्रपती शिवाजी महाराजांना आदर्श मानतो. महाराजांच्या पराक्रमाचा इतिहास जगभर पसरलेला आहे. ज्या महापुरूषाने आपल्या पराक्रमाने स्वराज्य निर्माण केले आहे. अशा महाराजांच्या रूपातील गणेश मुर्ती नदीमध्ये व इतर ठिकाणी विसर्जित होण्याची शक्यता आहे. हा छत्रपती शिवाजी महाराजांचा अवमान आहे. सदरचा प्रकार संतापजनक, चिड आणणारा तसेच अनेक शिवप्रेमींच्या भावना दुखावणारा आहे. त्यामुळे पिंपरी चिंचवड शहरातील गणेश मंडळास छत्रपती शिवरायांच्या रूपातील गणेश मुर्ती विक्रीस व मुर्ती स्थापना करण्यास पोलीस प्रशासनाने प्रतिबंध घालावा.

# रक्षाबंधनसाठी अतिरिक्त ९६ बसेस सोडण्यात येणार

**पिंपरी। न्यूज एक्सप्रेस मराठी।** पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधील नागरिकांसाठी पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेडच्या वतीने रक्षाबंधन निमित्त अतिरिक्त बस सोडण्यात येणार आहेत. रक्षाबंधन या सणाच्या दिवशी राखी बांधण्यासाठी भाऊ-बहीण एकमेकांच्या घरी जातात. या दिवशी मोठ्या संख्येने नागरिक प्रवास करत असतात. नागरिकांची गरज लक्षात घेत पीएमपीएमएलच्या वतीने ९६ जादा बस सोडण्यात येणार आहेत. दैनंदिन संचलनात असलेल्या १८३७ आणि अतिरिक्त ९६ अशा एकूण १९३३ बस या दिवशी रस्त्यावर धावणार आहेत. जादा बस गर्दीच्या मुख्य बस स्थानकांवरुन कात्रज, चिंचवड, निगडी, सासवड, हडपसर, वाघोली, जेजुरी, आळंदी,



भोसरी, तळेगाव, राजगुरुनगर, व देहूगाव इत्यादी ठिकाणी सोडण्यात येणार आहेत. याकरिता वाहक, चालक, पर्यवेक्षकीय सेवक यांच्या साप्ताहिक सुट्ट्या रद्द करण्यात आल्या आहेत. रक्षाबंधन ३० ऑगस्ट रोजी असून ३० आणि ३१ ऑगस्ट या दोन दिवशी पीएमपीच्या वतीने अतिरिक्त बससेवा पुरविण्यात येणार आहे.

महामंडळातील अधिकारी, लिपिक व इतर कर्मचारी यांची महत्त्वाच्या स्थानकांवर व थांब्यावर प्रवाशांना मार्गदर्शन करण्यासाठी व वाहतूक नियंत्रणासाठी नेमणूक करण्यात आली आहे.

# ६२ दुकाने परस्पर नावावर करून घेत तब्बल ११ कोटींची फसवणूक!

## एमआयडीसी भोसरी पोलिसांत गुन्हा दाखल

**जुनी सांगवी। न्यूज एक्सप्रेस मराठी।**

भागीदारीत बांधण्यात आलेल्या प्रकल्पातील ६२ दुकाने परस्पर नावावर करून घेतल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. यामध्ये तब्बल ११ कोटी २३ लाख २० हजार रुपयांची फसवणूक करण्यात आली आहे. हा प्रकार २४ मे रोजी पिंपरी चिंचवडमधील भोसरी येथील सेक्टर ११ मध्ये घडला आहे. प्रदीप पोपटलाल कर्नावट (वय ५३, रा. चिंचवड) यांनी याप्रकरणी सोमवारी (दि. २८) एमआयडीसी भोसरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार प्रशांत मणिलाल संघवी (वय ५५), संदेश मिश्रीलाल चोपडा (वय ५४) आणि प्रमोद भाईचंद रायसोनी (तिघे रा. जळगाव) यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार,




आरोपींनी संगनमत करून फिर्यादी यांची फसवणूक करण्याच्या उद्देशाने त्यांनी पी ३ डेव्हलपर्स भागीदारी संस्थेच्या वतीने बांधण्यात आलेल्या प्रसन्न गोल्डफिल्ड या प्रकल्पातील ६२ दुकाने त्यांच्या स्पेक्ट्रम रियाल्टी भागीदारी संस्थेच्या नावे केली. फिर्यादी यांनी दिनेश पारसकुमार मेहता, संजय मुल्तानचांद कासवा, संजय रमणभाई पटेल यांना आगाऊ रक्कम घेऊन काही दुकानांची विक्री केली होती.

### अधिक तपास पोलीस करीत आहेत

» आरोपींनी ११ वेगवेगळ्या दस्ताद्वारे करारनामा करून ६२ दुकाने त्यांच्या संस्थेच्या नावावर केली. त्यात फिर्यादी यांनी विक्री केलेल्या १६ दुकानांचा समावेश आहे. आरोपींना अधिकार नसताना ११ कोटी २३ लाख २० हजार रुपयांचा अपहार करून ६२ दुकाने, ऑफिसेस स्वत: च्या वैयक्तिक फायद्यासाठी स्पेक्ट्रम रियाल्टी भागीदारी संस्थेच्या नावावर करुन घेत फसवणूक केली असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. या प्रकरणाचा अधिक तपास एमआयडीसी भोसरी पोलीस करीत आहेत.

# पिंपळे सौदागरमध्ये १२ इंच पाईप लाईन टाकण्याचे काम सुरु

## नाना काटे यांच्या पाणी पुरवठा विभागाकडे पाठपुराव्यास यश

**पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्सप्रेस मराठी।**

प्रभाग क्र.२८ रहाटणी, पिंपळे सौदागर मधील कुणाल आयकॉन रोड वरील पीस व्हॅली सोसायटी ते साई पर्ल सोसायटी पर्यंत, तसेच राजमाता जिजाऊ उद्यान ते कुंजीर चौक साई प्लाटीनिम सोसायटी पर्यंत रस्त्याच्या दोन्ही बाजूस काही कारणास्तव पाण्याची नवीन लाईन टाकण्याची राहिली होती. माजी विरोधी पक्षनेते नाना काटे यांनी वेळोवेळी महापालिकेचे संबंधित अति. आयुक्त तसेच पाणी पुरवठा विभाग यांच्याकडे पत्राद्वारे व भेट घेवून पाठपुरावा केला होता. तसेच राजमाता जिजाऊ उद्यान लगत नवीन २५ लाख लिटर क्षमतेची पाण्याची टाकीन बांधून



तयार आहे. परंतु हे पाईप लाईन टाकण्याचे काम रखडल्यामुळे या सोसायटींना पाणी पुरवठा करण्यास अडचण निर्माण होत होती. यामुळे नागरिकांना पाणी समस्येला सामोरे जावे लागत होते.

हि बाब लक्षात घेता मागील आठवड्यात संबंधित पाणी पुरवठा विभागाच्या अधिकारी यांच्या समवेत झालेल्या बैठकीत योग्य पर्याय काढून लवकरात लवकर या १२ इंच नवीन पाण्याच्या पाईप लाईनचे काम सुरु करण्याच्या सूचना दिल्या होत्या.

त्यानुसार नाना व शितल काटे याच्या पाठपुराव्यास यशप्राप्ती म्हणून कुणाल आयकॉन रोड वरील पीस व्हॅली सोसायटी ते साई पर्ल सोसायटी पर्यंत, तसेच राजमाता जिजाऊ उद्यान ते कुंजीर चौक साई प्लाटीनिम सोसायटी पर्यंत रस्त्याच्या दोन्ही बाजूस आज १२ इंच व्यासाची पिण्याच्या पाण्याची लाईन टाकण्याच्या कामास सुरुवात करण्यात आली. त्यामुळे या कुणाल आयकॉन रोड वरील संबंधित सोसायटीना नवीन बांधलेल्या २५ लाख लिटर पाण्याच्या टाकीमधून मुबलक व योग्य प्रमाणत पुरवठा करण्यास सोपे जाणार आहे.

# शैक्षणिक दर्जा वाढवा : आयुक्त शेखर सिंह

**पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्सप्रेस मराठी।**

पालिकेच्या शाळांमधील शिक्षणाचा दर्जा वाढविण्यासाठी, सर्व शिक्षकांना नियमित मदत मिळावी, शैक्षणिक गुणवत्तेत भर पडत राहावी तसेच शिक्षण विभागामार्फत राबविले जाणारे उपक्रम अधिक सक्षमपणे शाळांपर्यंत पोहोचवण्यासाठी शिक्षण विभागाने १८ सदस्यीय संघाची (कोअर टीम) स्थापना केली आहे, अशी माहिती आयुक्त शेखर सिंह यांनी दिली. शिक्षण विभागामार्फत राबविल्या जाणारे विविध कार्यक्रम, योजना, उपक्रम तसेच या कार्यक्रमांचे नियोजन, अंमलबजावणी आणि आढावा घेण्यासाठी कोअर टीमची भूमिका महत्वाची असणार आहे, असेही ते म्हणाले. कोअर टीमबाबत माहिती देताना शिक्षण विभागाचे सहाय्यक आयुक्त विजयकुमार थोरात म्हणाले, आयुक्त शेखर सिंह यांच्या संकल्पनेतून शिक्षण विभागाच्या मदतीसाठी कोअर टीमची प्राथमिक व माध्यमिक विभागासाठी स्वतंत्र स्थापना करण्यात आली आहे. ही कोअर टीम शिक्षण विभागामार्फत राबविल्या जाणा-या शैक्षणिक उपक्रमांच्या प्रभावी अंमलबजावणीमध्ये तसेच अध्यापनासंदर्भात सहाय्यकारक ठरेल असे काम करणार आहे. महापालिकेच्या शाळांव्यतिरिक्त इतर शाळांमध्ये शिक्षणाची प्रक्रिया कशी चालते, विविध प्रकारे विद्यार्थ्यांना अध्यापन कसे केले जाते या दृष्टीकोनातून क्षमता बांधणीसाठी या टीममधील सदस्यांसोबत अभ्यास दौऱ्यांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

# पुणे पालिकेचा आंधळा कारभार !

## सिंहगड रस्त्यावरील उड्डाणपुलाचा खांब 'चुकला'

**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।** वाहतूक कोंडीच्या गर्तेत अडकलेल्या सिंहगड रस्त्यावरील उड्डाणपुलाच्या एका खांबाचे (पिलर) नियोजन चुकल्याचे गुणवत्ता तपासणी निकषातून पुढे आले आहे. त्यामुळे संतोष हॉल परिसरातील उड्डाणपुलाच्या एका खांबाचा काही भाग पाडण्याची नामुष्की महापालिका प्रशासनावर आली आहे. यापूर्वी मेट्रो मार्गिकेचे खांब निकषाप्रमाणे नसल्याचे पुढे आल्यानंतर महापालिकेचे नियोजनही चुकल्याचे स्पष्ट झाले आहे.यापूर्वी प्रस्तावित मेट्रो मार्गिकेसाठी उड्डाणपुलाच्या कामाचा आराखडा बदलण्याची वेळ महापालिकेवर आली होती. त्यानंतर आता सिंहगड रस्त्यावरील उड्डाणपुलाच्या खांबाचा आराखडा बदलावा लागला आहे. त्यामुळे खर्च वाया गेला असून, पुढील काही दिवस वाहनचालकांना कोंडी सहन करावी लागणार आहे. सिंहगड रस्त्यावरील वाहतुकीची कोंडी सोडविण्यासाठी महापालिकेच्या वतीने राजाराम पूल ते फनटाइन या दरम्यान उड्डाणपूल उभारण्यात येत आहे. उड्डाणपुलाचे आतापर्यंत ५० टक्के काम पूर्ण झाले असून, पुढील वर्षाअखेरपर्यंत उड्डाणपूल वाहतुकीसाठी खुला करण्याचे महापालिकेचे नियोजन आहे. उड्डाणपुलासाठी गोयल गंगा ते संतोष हॉल या दरम्यान दहा खांब उभारणीसह गर्डर टाकण्याचे काम पूर्ण झाले असून, संतोष हॉल ते विठ्ठलवाडी या दरम्यान खांब उभारण्यात आले आहेत. या दहा खांबांच्या कामाच्या गुणवत्तेची तपासणी महापालिका प्रशासनाकडून करण्यात आली. त्यावेळी संतोष हॉल चौकातील खांबाचे काम सदोष असल्याचे महापालिकेच्या अधिकाऱ्यांना आढळून आले. संतोष हॉल चौकातील खांबाच्या कामाची गुणवत्ता 'एम-३०' एवढी दिसून आली. त्यामुळे तीन मीटर अंतराचा भाग पाडण्याची नामुष्की महापालिका प्रशासनावर आली.

सिंहगड रस्त्यावरील उड्डाणपुलाचे काम सुरू करण्यास विलंब झाला. सध्या उड्डाणपुलाच्या कामामुळे रस्त्याची मोठ्या प्रमाणावर दुरवस्था झाली असून, वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागत आहे. यापूर्वी उड्डाणपुलाची कामे सुरू करण्यात आल्यानंतर प्रस्तावित मेट्रो मार्गिकेचा विचार करण्यात आला नसल्याचे पुढे आले होते. त्यामुळे काम सुरू करण्यापूर्वी पुन्हा आराखडा करावा लागला. त्यानुसार उड्डाणपुलाच्या मार्गात मेट्रोच्या खाबांसाठी काही जागा ठेवण्यात आली आहे.



> **"गुणवत्ता तपासणीत खांबाचा तीन मीटर अंतराचा भाग चुकल्याचे आढळून आले. त्यामुळे तो भाग तोडून नव्याने काम सुरू करण्यात आले आहे. त्याचा आर्थिक फटका महापालिकेला बसणार नाही. ठेकेदाराकडून ते काम केले जाणार आहे.**
>
> **- अजय वायसे,**
> **कार्यकारी अभियंता, पुणे महापालिका**

### दररोज सव्वा लाख वाहनांची ये-जा

**» या रस्त्यावरून दररोज १ लाख २५ हजार वाहने ये-जा करतात, असे सर्वेक्षणात नोंदविण्यात आले आहे. वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी चार पर्यायी नकाशे तयार करण्यात आले होते. त्यापैकी स्वारगेटकडे जाणाऱ्या वाहनांसाठी राजाराम पूल चौकात ४९५ मीटर लांबीचा आणि सिंहगडकडे जाणाऱ्या वाहनांसाठी राजाराम पूल ते फनटाइम चित्रपटगृहापर्यंत २ हजार १२० मीटर लांबीचा उड्डाणपूल उभारण्यात येणार आहे. दुहेरी वाहतुकीसाठी पुलाची रुंदी १६.३ मीटर आणि एकेरी वाहतुकीसाठी पुलाची रुंदी ८.१५० मीटर एवढी आहे. उड्डाणपुलामुळे २.७४ किलोमीटर अंतराची वाहतूक थेट होणार आहे.**

# दराडेंचा जामीन अर्ज फेटाळला!

## नोकरीच्या आमिषाने ४४ जणांची पाच कोटींची फसवणूक

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** शिक्षण विभागात नोकरी लावण्याचे आमिषाने ४४ जणांना तब्बल पाच कोटींची फसवणूक प्रकरणी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेचे तत्कालीन आयुक्त शैलजा रामचंद्र दराडे हिचा जामीन अर्ज लष्कर न्यायालयाने फेटाळून लावला. लष्कर न्यायालयाने प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी डी. जे. पाटील यांनी याबाबतचे आदेश दिले. नोकरीच्या आमिषाने फसवणूक केल्याप्रकरणी फेब्रुवारी महिन्यात शैलजा रामचंद्र दराडे( रा.पाषाण) हिच्यासह तिचा भाऊ दादासाहेब रामचंद्र दराडे ( रा. इंदापूर) यांच्याविरुद्ध हडपसर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. याबाबत पोपट सुखदेव सूर्यवंशी ( रा. खाणजोडवाडी, आटपाडी, सांगली) यांनी फिर्याद दिली होती. त्यानंतर ७ ऑगस्ट रोजी पोलिसांनी शैलजा हिला अटक केली होती.



तिला न्यायालयाने पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले होते. त्यानंतर तिने जामीन मिळवण्यासाठी लष्कर न्यायालयात वकिलांमार्फत अर्ज दाखल केला. सरकारी वकिलांनी दराडे हिच्या जामिनास विरोध केला. गुन्हा गंभीर स्वरुपाचा असून, याप्रकरणाचा तपास सुरू आहे. दराडेला जामीन मंजूर झाल्यास तपासास बाधा येईल. त्यामुळे जामीन मंजूर करण्यात येऊ नये, अशी विनंती सरकारी वकिलांनी युक्तीवादात केली. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी डी. जे. पाटील यांनी सरकार पक्षाचा युक्तीवाद ग्राह्य धरुन दराडे यांचा जामीन अर्ज फेटाळला.

### फसवणूक प्रकरण नेमके काय ?

**» फिर्यादी सूर्यवंशी शिक्षक असून त्यांच्या नात्यातील महिलेला शिक्षक पदावर नोकरी मिळवायची होती. त्यासाठी ते विविध ठिकाणी माहिती घेत असताना जून २०१९ मध्ये सूर्यवंशी यांची भेट आरोपी दादासाहेब दराडे याच्याशी झाली. त्याने बहीण शैलजा दराडे शिक्षण विभागात अधिकारी असल्याचे सांगितले. त्यानुसार मी तुमच्या दोन नातेवाईक महिलांना शिक्षक पदावर नोकरी लावतो असे सांगितले. आरोपी दादासाहेब याने त्यांना आमिष दाखवून त्यांच्याकडून हडपसरमध्ये २७ लाख रुपये घेतले. काही महिने उलटल्यानंतरही नातेवाईक महिलांना नोकरी न लावल्याने सूर्यवंशी यांनी पैसे मागितले. मात्र, त्याने पैसे परत न देता फसवणूक केली. दराडे यांनी विविध शासकीय विभागात नोकरी लावण्याचे आमिष दाखवून ४४ जणांची पाच कोटी रुपयांची फसवणूक केल्याचे तपासात उघडकीस आले होते.**

# नोकरीचे आमिष; १२ लाखांना लुबाडले

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** परदेशातील कंपनीत नोकरीचे आमिष दाखवून एका व्यक्तीची १२ लाख रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार समोर आला आहे. सायबर पोलिसांनी कौशल्यपूर्ण तपास करून आरोपीला हरियानातील गुडगाव येथून अटक केली. आरोपीकडून लॅपटॉप, तीन मोबाईल संच आणि १२ लाखांची रोकड हस्तगत केली आहे.याबाबत एका व्यक्तीने पुणे सायबर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. जयंतकुमार परमानंद मलिक (वय-२९, रा. पालमविहार, गुडगाव, हरियाना) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शालिनी शर्मा आणि करण सिंग नावाच्या व्यक्तींनी मोबाईलवरून फिर्यादीशी संपर्क साधला.ते एका सल्लागार कंपनीत काम करीत असल्याचे सांगितले. त्यानंतर त्यांनी फिर्यादीला इ-मेल पाठविला. त्यात परदेशातील एका कंपनीत वरिष्ठ महाव्यवस्थापक पदावर नोकरी मिळवून देतो, असे सांगून शर्मा आणि सिंग यांनी त्यांना लिंक पाठवली. फिर्यादीने त्यांना लिंकवरून ११ लाख ९१ हजार रुपये पाठविले. परंतु नोकरी न मिळाल्याने आर्थिक फसवणूक झाल्याचे लक्षात आले. त्यावर त्यांनी १८ जुलै रोजी सायबर पोलिस ठाण्यात तक्रार दिली. याबाबत सायबर पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला.आरोपींनी गुन्ह्यात वापरलेले मोबाईल क्रमांक, ईमेल आयडी, पैसे पाठविण्यासाठी दिलेली लिंक आणि बँक खात्यांचा तांत्रिक तपास केला.

# कुरुलकर प्रकरणाची सुनावणी बंद खोलीत घ्या!

## ‘एटीएस’कडून न्यायालयात अर्ज



### नेमकी काय केली चौकशी

» विश्लेषण अहवाल आणि न्यायवैद्यकीय अहवाल मिळाला आहे. एटीएसने कुरुलकरविरुद्ध मे महिन्यात गुन्हा दाखल करून अटक केली. एप्रिल महिन्यात चार दिवस एटीएसकडून कुरुलकरची चौकशी करण्यात आली होती. एटीएसने कुरुलकरला स्मरणपत्रेही पाठविली होती. कुरुलकरने एटीएस चौकशीला सहकार्य केले. एटीएसने नेमकी काय चौकशी केली, याबाबतचा अहवाल अद्याप न्यायालयात सादर करण्यात आलेला नाही.

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** संरक्षण संशोधन विकास संस्थेतील (डीआरडीओ) वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. प्रदीप कुरुलकरने ब्रम्होस, रुस्तम, अग्नी, अशा क्षेपणास्त्रांची दिलेली गोपनीय माहिती अत्यंत संवेदनशील आहे. सुनावणी दरम्यान संबंधित माहिती प्रसारित झाल्यास देशाच्या सार्वभौमत्वाला बाधा पोहोचू शकते. त्यामुळे कुरुलकर प्रकरणाची सुनावणी बंद खोलीत (इन कॅमेरा) घेण्यात यावी, असा अर्ज राज्य दहशतवाद विरोधी पथकाकडून (एटीएस) मंगळवारी (२९ ऑगस्ट) विशेष न्यायालयात सादर करण्यात आला.

सरकार पक्षाकडून सरकारी वकील ॲड. विजय फरगडे यांनी विशेष न्यायाधीश एस. व्ही. कचरे यांच्या न्यायालयात मंगळवारी अर्ज दाखल केला. कुरुलकरविरुद्ध एटीएसकडून आरोपपत्र दाखल करण्यात आल्यानंतर त्याने त्याचे वकील ॲड. ऋषिकेश गानू यांच्यामार्फत जामिनासाठी अर्ज केला आहे. जामीन अर्जावर ॲड. गानू यांनी युक्तीवाद केला. त्यावेळी सरकार पक्षाकडून 'इन कॅमेरा' सुनावणीचा अर्ज न्यायालयात दाखल करण्यात आला. मंगळवारी दूरदृश्य संवाद सुविधेद्वारे कुरुलकर सुनावणीस उपस्थित होता. कुरुलकरच्या जामीन अर्जास ॲड. फरगडे यांनी विरोध केला. कुरुलकरने पाकिस्तानी गुप्तचर यंत्रणेतील हेराला गोपनीय माहिती दिली आहे. त्याने मोबाइलमधील विदा (डेटा) नष्ट केला आहे. तो परत मिळवायचा आहे. आरोपी कुरुलकर वरिष्ठ अधिकारी आहे. तो साथीदारांवर दबाव आणू शकतो. त्याला जामीन दिल्यास तो पुन्हा पाकिस्तानी गुप्तचर यंत्रणेशी संपर्क साधण्याची शक्यता नाकारता येत नाही, असा युक्तिवाद ॲड. फरगडे यांनी केला. कुरुलकरला अटक करण्यापूर्वी या प्रकरणाचा तपास २४ फेब्रुवारीपासून सुरू झाला आहे. एटीएसने कुरुलकरचा मोबाइल संच, लॅपटॉप आणि हार्डडिस्क जप्त केली आहे. जप्त केलेल्या मुद्देमालांचे डीआरडीओ, न्यायवैद्यक प्रयोगशाळा आणि एटीएस यांच्याकडून विश्लेषण करण्यात आले आहे. विश्लेषण अहवाल आणि न्यायवैद्यकीय अहवाल मिळाला आहे. एटीएसने कुरुलकरविरुद्ध मे महिन्यात गुन्हा दाखल करून अटक केली. एप्रिल महिन्यात चार दिवस एटीएसकडून कुरुलकरची चौकशी करण्यात आली होती. एटीएसने कुरुलकरला स्मरणपत्रेही पाठविली होती. कुरुलकरने एटीएस चौकशीला सहकार्य केले. एटीएसने नेमकी काय चौकशी केली, याबाबतचा अहवाल अद्याप न्यायालयात सादर करण्यात आलेला नाही. एटीएसने दाखल केलेल्या आरोपपत्रातही चौकशी अहवालाचा समावेश करण्यात आलेला नाही, असे ॲड. गानू यांनी युक्तीवादात न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. कुरुलकरने पाकिस्तानी हेर महिलेला पाठविलेली माहिती गोपनीय आहे का?, ही माहिती सार्वजनिक क्षेत्रात उपलब्ध आहे. कुरुलकरकडून जप्त करण्यात आलेल्या मोबाइलमध्ये किंवा इलेक्ट्रॉनिक उपकरणात कोणतीही गोपनीय माहिती मिळालेली नाही. तपास पूर्ण झाला आहे. जामीन मिळणे हा आरोपीचा अधिकार असल्याचे ॲड. गानू यांनी युक्तिवादात नमूद केले. दोन्ही बाजूचा युक्तिवाद झाल्यानंतर कुरुलकरच्या जामीन अर्जावर पुढील सुनावणी ४ सप्टेंबर रोजी होणार आहे.

# पुणे-दौंडदरम्यान रेल्वे सुसाट!

## रेल्वे ताशी १३० किलोमीटर वेगाने धावण्यास सुरूवात



> “दौंडदरम्यान सर्वच गाड्या ताशी १३० किलोमीटर वेगाने धावण्याची योजना आखण्यात आली आहे. सर्व गाड्यांचा वेग हळूहळू वाढविला जाईल. याआधी या विभागात सर्व गाड्या ताशी ११० किलोमीटर वेगाने धावत होत्या.
>
> - डॉ. रामदास भिसे, जनसंपर्क अधिकारी, मध्य रेल्वे

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** पुणे ते दौंडदरम्यान रेल्वे गाड्या आता सुसाट धावू लागल्या आहेत. या मार्गावर सोमवारपासून प्रवासी गाड्या ताशी कमाल १३० किलोमीटर वेगाने धावण्यास सुरुवात झाली. या मार्गावर वाढलेल्या वेगाने धावणारी लोकमान्य टिळक टर्मिनस – विशाखापट्टणम एक्स्प्रेस ही पहिली गाडी ठरली. लोकमान्य टिळक टर्मिनस – विशाखापट्टणम एक्स्प्रेस ही गाडी पुण्याहून सकाळी १० वाजून ४२ मिनिटांनी निघाली आणि दौंडहून ती ११ वाजून ४३ मिनिटांनी पुढे मार्गस्थ झाली. पुणे-दौंड दरम्यानच्या एकूण ७६ किलोमीटर अंतरात गाडीने धावण्याचा पाच मिनिटांचा वेळ वाचवला. उद्या (मंगळवारी) आणखी दोन गाड्या या मार्गावर ताशी १३० किलोमीटर वेगाने धावणार आहेत. त्यात इंदोर – दौंड एक्स्प्रेस आणि मुंबई – बंगळुरू उद्यान एक्स्प्रेस यांचा समावेश आहे.मुख्य सुरक्षा आयुक्त मनोज अरोरा, मध्य रेल्वेचे सरव्यवस्थापक नरेश लालवाणी, विभागीय रेल्वे व्यवस्थापक इंदू दुबे यांच्यासह अधिकाऱ्यांच्या पथकाने या विभागाची तांत्रिक पाहणी केली होती. त्यानंतर त्यांनी काही सुधारणा सुचवल्या होत्या. अखेर या सुधारणा पूर्ण झाल्यानंतर सोमवारी ताशी १३० किलोमीटर वेगाने पहिली गाडी या मार्गावर धावली. या मार्गावर गाड्यांचा वेग वाढविण्यासाठी ट्रॅक तयार करणे, सिग्नलिंगसह इतर तांत्रिक कामे पूर्ण करण्यात आली आहेत. सुरक्षेच्या बाबींवर योग्य लक्ष देऊन गाड्यांचा वेग वाढविण्यात आला आहे.

# श्वानांच्या लसीकरण, नसबंदी मोहिमेत अडथळा

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** शहरातील मोकाट श्वान आणि मांजरांचे लसीकरण. नसबंदी करण्यासाठी महापालिकेने दोन संस्थांची नियुक्ती केली आहे. मात्र, या संस्थांच्या कामात नागरिकांकडून अडथळा निर्माण केला जात असल्याने मोहीम रखडली असल्याचे स्पष्ट झाले आहे. या मोहिमेला विरोध करणाऱ्या नागरिकांवर कायदेशीर कारवाई करण्याचा इशारा महापालिकेच्या आरोग्य विभागाने दिला आहे. शहराच्या हद्दीतील मोकाट श्वान आणि मांजरांची नसबंदी शस्त्रक्रिया तसेच लसीकरण करण्याची मोहीम महापालिकेच्या आरोग्य विभागाने हाती घेतली आहे. त्यासाठी ॲनिमल वेलफेअर बोर्ड ऑफ इंडिया यांनी दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार ही मोहीम सुरू करण्यात आली आहे.महापालिकेच्या स्थायी समितीने १६ एप्रिल २०२० मध्ये युनिव्हर्सल ॲनिमल वेलफेअर सोसायटी आणि कॅनाइन कंट्रोल, केअर ट्रस्ट या दोन संस्थांची नियुक्ती केली आहे.

शहरातील मोकाट श्वान आणि मांजरांची नसबंदी शस्त्रक्रिया आणि लसीकरण या दोन संस्थांकडून करण्यात येत आहे. मात्र, लसीकरण करण्यात आलेले मोकाट श्वान आणि मांजरे आपल्या भागात सोडण्यात येऊ नये, यासाठी संस्थेच्या कर्मचाऱ्यांना दमदाटी करण्यात येत आहे.